जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३१/१२/२०२३
## दि.३०/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे २७९/२०२३,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | चंपालाल राजपुरोहीत,वय-५८ वर्षे,सोमवार पेठ,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१२/२०२३ रोजी १७/०० वा.४५६,सोमवार पेठ,साईकृपा हौसिंग सोसायटी,फ्लॅट क्र०४, पुणे याठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा दिपक राजपुरोहित,वय-२५,रा.सदर याने त्याचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या केली होती. एकंदरीत झाले तपासाचे चौकशीअंती व कागदपत्राचे अवलोकन करता, दिपक राजपुरोहित याने यातील नमुद इसम व महिला यांचेकडुन घेतलेल्या कर्जाचे पैसे परत न दिल्याचे कारणावरून,त्यांनी दिपक यास वेळोवेळी मानसिक त्रास देवुन, दिपक यास त्याचे राहते घरातील हॉल मधील फॅनला असलेल्या लोखंडी हुकाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. ज्योती कुटे ८३२९५०७५५३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३९२/२०२३,भादविक ३०७,३२४,३२३,५०६,महा.पो.का.क.३७(१)(३)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | अक्षय सातपुते,वय ३० वर्षे,रा.ताडीवाला रोड,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/१२/२०२३ रोजी पहाटे ०३/३० वा.ते ०३/४५ वा.चे दरम्यान ग्राफिकॉन बिल्डींग ट्रॅव्हल पॉईट येथील फुटपाथ जवळ तसेच लडकतवाडी रोडवरील मटन शॉप जवळ,१३ ताडीवाला रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे ओळखीचे नमुद इसमांनी सुमारे तीन महिन्यापुर्वी नवरात्री उत्सवा मध्ये दांडिया खेळताना त्यांचेमध्ये झालेल्या वादाच्या कारणावरून फिर्यादी व त्यांचा भाचा यश सोनवणे यांना ग्राफिकॉन बिल्डींग ट्रॅव्हल पॉईट येथील फुटपाथवर धक्का-बुक्की करून,यश याचे डोक्यात दगड मारून जखमी केले. त्यावेळी फिर्यादी व यश हे घाबरून पळुन जात असताना,सदर इसमांनी लडकतवाडी रोडवरील मटन शॉप जवळ,१३ ताडीवाला रोड,पुणे येथे लोखंडी हत्याराने फिर्यादी यांचे डोक्यात मारून,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. अभिजीत जाधव ८२७५३४०३३१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८६५/२०२३,भादविक ३०७,४५२,३२३,५०४,५०६,४२७,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | अंकूश शिंदे वय ४७ वर्षे रा.येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचा साथीदार (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/१२/२०२३ रोजी १८/२५ वा. करूणा हौसि.सोसा.येरवडा,पुणे याठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा अल्पवयीन मुलगा,वय-१७ वर्षे यास यातील नमुद इसम यांनी दि.२६/१२/२०२३ रोजी तु आमचे बरोबर का राहत नाही,बोलत नाही असे म्हणुन त्यास शिवीगाळ व दमदाटी केली होती. सदरबाबत फिर्यादी हे त्यांचे मुलास घेवुन जाब विचारण्यासाठी त्यांचेकडे गेले असता,त्यांनी आता तुम्हांला दोघांना जीवंत सोडणार नाही अशी धमकी देवुन निघुल गेले होते. त्यानंतर दि.२७/१२/२०२३ रोजी १८/२५ वा.फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह भाजी आणण्याकरीता गेले असताना,सदर इसमांनी फिर्यादी यांचे घरासमोर लावलेली मोटार सायकलची तोडफोड करून तीचे नुकसान केले. त्यावेळी फिर्यादी हे सदर ठिकाणी आले असता,त्यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,फिर्यादी यांचे अंगावर धावुन जाऊन लोखंडी हत्याराने फिर्यादीचे डोक्यास मारून,त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विष्णु होले ८८८८८७४१४३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे ३०९/२०२३,भादविक ३९४,५११,५०६ |
| **फिर्यादी** | रुपेशकुमार सोनकांबळे,वय-२६ वर्षे,रा.स नं.६६०/६,राजीवगांधीनगर,बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/१२/२०२३ रोजी १४/०० वा.कन्या शाळे जवळ,गणपती मंदिर व मारुती मंदीराच्या मधील मोकळया जागेत,सोलापुर बाझार,कॅम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कॅन्टोमेन्ट येथे सुपरवायझर म्हणुन काम करतात. फिर्यादी यांनी सोलापुर बाजार कॅम्प,पुणे येथील त्यांचे ऑफिस मधील सुपरवायझर रोहित लोंखडे यांनी फोनव्दारे कळविले की,यातील नमुद इसम हा त्यांना मारहाण करीत आहे. फिर्यादी यांनी सदर ठिकाणी जावुन त्यास जाब विचारल्याचे कारणावरुन त्याने चिडुन जावुन,तेथे जवळच कच-यात पडलेले काचेचे बाटली जमिनीवर फोडुन,फुटलेली काचेची बाटलीने फिर्यादी यांचे तोंडावर व उजव्या हाताच्या बोटावर मारहाण करून,सदर बाटलीचा त्यांना धाक दाखवुन,फिर्यादी यांचे उजव्या हाताच्या बोटातील सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढण्याचा प्रयत्न करून,तुझी अंगठी काढुन दे,नाहीतर तुला मारुन टाकीन अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.आर.मोकाटे ९०२१३०३०५८ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे ३१०/२०२३,भादविक ३५३,३३२,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला पोलीस अंमलदार, लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/१२/२०२३ रोजी १४/१६ वा.कन्या शाळे जवळ,गणपती मंदिर व मारुती मंदीराच्या मधील मोकळया जागेत,सोलापुर बाझार,कॅम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया लष्कर पोलीस स्टेशन येथे सोलापुर बाझार मार्शल म्हणुन सरकारी कर्तव्याव बजावित असताना,त्यांना दुपारी १४/१४ वा. नियंत्रण कक्षावरून कॉल आल्याने,सदर कॉलची पुर्तता करणेकामी नमुद ठिकाणी गेले असताना,एका इसमाच्या हातामध्ये फुटलेली काचेची बॉटल दिसली. फिर्यादी यांनी सदर इसमास त्याचे हातातील फुटलेली काचेची बाटली खाली टाकण्यास सांगितल्याचे कारणावरून,त्यांनी फिर्यादीस अपशब्द वापरले. फिर्यादी हे त्यांचे मोबाईलवर त्याचे शुटिंग करून,त्यास "मी तुझे शुटिंग करीत आहे,तु तुझ्या हातातील काचेची बाटली खाली टाकुन दे" असे बोलले असता,सदर इसमाने फिर्यादी यांना धक्का-बुक्की वगैरे करून,तीचे हातातील लाठी व हातातील मोबाईल हिसकावुन घेवुन,मोबाईल रस्त्यावर फेकुन देवुन,त्याचे हातातील काचेची फुटलेली बाटली फिर्यादी यांचे गळ्याजवळ आणुन मी तुला खल्लास करुन टाकेल अशी धमकी देवुन तेथुन पळुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. व्ही.एन.डेंगळे ८९७५९२२१०० |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १९६४/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४८ वर्षे,रा.गवळी वस्ती,मांजरी-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २६/१२/२०२३ रोजी दुपारी १६/०० वा.ते दि.३०/१२/२०२३ रोजी पहाटे ०३/०० वा.चे दरम्यान हाऊस नं.६५८,सर्वे नं.१५६,गवळी वस्ती,मांजरी-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील लाकडी कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेले २,३०,०००/- रूपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण ३,७०,८७०/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सचिन दाभाडे ९३२२३५८०२७ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३८९/२०२३,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | लक्ष्मण शिंदे,वय-३१ वर्षे,रा.जाधवनगर,वडगाव-बद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | एस.टी.बसवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २९/१२/२०२३ रोजी १८/३० वा. दांडेकर पुल,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे दाजी अंकुश दत्तु गलांडे,वय-३९ वर्षे,रा.सिंहगड रोड,माणिक बाग,पुणे हे कामावरुन सुटुन त्यांचे राहते घरी जात असतान,यातील नमुद एस.टी.बसवरील चालकाने त्याचे ताब्यातील एस.टी.बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी अंकुश दत्तु गलांडे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.पी.जाधव ०२०/२४२२०२०५ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ६३४/२०२३,भादविक ३०४(अ),३३७,३४ |
| **फिर्यादी** | स्वप्नील लोहार, पोलीस उप-निरीक्षक, सिंहगड रोड पो स्टे,पुणे शहर |
| **आरोपीत** | मे.आर्या ट्रान्सकेअर,धायरी,पुणे या कंपनीचे संचालक व इतर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०८/१२/२०२३ रोजी ०२/३० वा. शिवाजी महाराज पुतळया जवळील घुले नगर,वडगाव बुद्रुक,पुणे येथील महावितरणच्या लाईट डी.पी. क्र.४६७७८२६,वडगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | सिंहगड रोड पो स्टे अ.मयत रजि.नं.२२२/२०२३,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद मे.आर्या ट्रान्सकेअर,धायरी, पुणे या कंपनीचे संचालक व इतर यांनी त्यांचेकडे काम करणारे कामगार १.सागर शांतप्पा पुजारी २.गड्डेप्पा आप्पासाहेब गुरव ३.सागर प्रेमनाथ शिंदे यांना विद्युत डीपीचे दुरुस्तीचे काम करणेसाठी लागणारी सुरक्षिततेची पर्याप्त साधने न पुरविता,तसेच कामगार काम करीत असलेल्या ठिकाणी वीज पुरवठा खंडीत झालेला आहे,अगर कसे याबाबतची खात्री न करता हलगर्जीपणा व निष्काळजीपणा करून,यातील कामगारांना महावितरणच्या लाईट डीपीचे मेंटनन्सचे काम करण्यास सांगुन,ते काम करीत असताना,त्यामध्ये सागर शांतप्पा पुजारी,वय-२६ वर्षे,रा.दबाडी वस्ती,वडगाव-बुद्रुक,पुणे यास शॉक लागल्याने तो गंभीररित्या जखमी होवुन,त्याच्या मृत्युस कंपनीचे संचालक व इतर कारणीभुत होवुन,इतर कामगार १.गड्डेप्पा आप्पासाहेब गुरव २.सागर प्रेमनाथ शिंदे यांचे जीवाला धोका निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा पोलीस निरीक्षक, दिपक कादबाने ९६२३४५९०९७ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३०९०/२०२३,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | गणेश पुकळे, पोलीस अंमलदार, पर्वती पोलीस ठाणे,पुणे शहर |
| **आरोपीत** | ऊषा किरण साईटचे कॉन्ट्रक्टर इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१२/२०२३ रोजी साधारण सकाळी १०/३० वा.विजयनगर उदयान,सदाशिव पेठ,पुणे येथे उषा किरण या बांधकाम साईटवर |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसम ऊषा किरण साईटचे कॉन्ट्रक्टर याने विजयनगर उदयान,सदाशिव पेठ पुणे येथे उषा किरण येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट, सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील कामगार सैय्यद अहमद अस्लम खान हा सद<br>र साईटचे कंपाऊडचे पत्रे रिपेयर करत असताना,सदर साईटचे कॉन्ट्रक्टर याने कोणतीही उपाययोजना केली नसलेने तिसऱ्या मजल्यावरील लिफ्ट मधुन एक लाकडी फळी सैय्यद खान याचे डोक्यात पडल्याने,त्यामध्ये तो गंभीर जखमी झाल्याने,त्याचेवर उपचार चालु असताना,दिनांक २०/१२/२०२३ रोजी सैय्यद खान याचा उपचारदरम्यान मृत्यु झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.टी.जगदाळे ०२०/२४२२०२०५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**